नि.दि.दा.क्र.८८/२०१७
दत्तात्रय वि. मारुती व इतर
नि. क्र. ३१ पुढे सुरु

**प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्यातर्फे साक्षीदार क्र.२ ची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु**
**प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. यु. एच. सणस.**

हे म्हणणे खरे आहे की, मला आज रोजी न्यायालयात हजर राहणेकरीता साक्षीसमन्स आलेले नव्हते. मला आज रोजी हजर राहण्याबाबत दिलीप गार्डे यांनी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी आज रोजी न्यायालयात हजर आहे. मला त्यांनी जबाब काय द्यायचा याविषयी काही सांगितले नाही. मला प्रस्तुतच्या प्रकरणाविषयी माहिती नाही. तसेच, त्यातील वादी व प्रतिवादी यांच्या विषयी माहिती नाही. दावा मिळकतीचा गट क्रमांक १३६९ आहे. सदरील क्रमांकाची माहिती मला कोणीही दिली नाही. दावा मिळकतीच्या ७/१२ उता-याला कोणाच्या नावाची नोंद आहे याविषयी मला काहीही सांगता येणार नाही.

०२. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी कोण आहेत त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. मी मारूती रामा गार्डे यांना ओळखत नाही. त्यामुळे, ते सद्यस्थितीत हयात आहेत किंवा कसे याविषयी देखील मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मारूती गार्डे कोण होते याविषयी मला माहिती नाही. दावा मिळकतीत मारूती गार्डे यांनी सध्या ज्वारीचे पिक केले आहे, त्याअगोदर त्यांचे सोयाबिनचे पिक होते व ते मारूती गार्डे यांनी केले होते असा माझ्या शपथपत्रतील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविलेला नाही. मारूती गार्डे यांना एकूण किती भाउ होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना किती पुतने होते हे देखील मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतो की, त्यांना दोन पुतने होते. कृष्णा रामा गार्डे यांना किती मुले होती हे मला सांगता येणार नाही. आण्णा रामा गार्डे व लक्ष्मण रामा गार्डे असे दोन भाउ मारूती रामा गार्डे यांना होते याबाबत मला माहिती नाही. लक्ष्मण आणि आण्णा किती मुले होती व त्यांची काय नावे होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मारूती गार्डे यांना दोन पुतने असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला मारूती गार्डे यांच्या पुतन्यांची संपुर्ण नांवे सुध्दा सांगता येणार नाहीत.

०३.		हे म्हणणे खरे आहे की, मारूती रामा गार्डे यांना मंगल नावाची मुलगी असल्याचे मला सांगता येणार नाही. सदरील मंगल ही मारूती गार्डे यांच्या सगळया मिळकती मालकी हक्काने वहिवाटीत असल्याचे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला न्यायालयात हजर असलेले प्रतिवादी दिलीप गार्डे यांचे संपुर्ण नांव सांगता येणार नाही. माझे त्यांच्याशी चांगले संबंध आहेत. माझ्या शेतमिळकतीचा गट क्रमांक १३५५ब असा आहे. त्यामुळे, माझ्या प्रतिज्ञापत्रात केवळ गट क्रमांक १३५५ चा उल्लेख चुकीचा केलेला आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर वाचून पाहिला नसल्याने मला त्याबाबत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरील प्रतिज्ञापत्र कोणी तयार केले व त्यातील मजकूर कोणी नमूद केला याविषयी देखील मला सांगता येणार नाही. मी राहायला पुर्नवसीत व्याहळी येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुर्नवसन व्याहळी येथून बावधन येथे नेहमीचे येणे जाणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्रमांक १३५५ हा दावा मिळकतीला लगत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरील दावा मिळकतीत मी वादी कुदळे यांना कधीही पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मारूती रामा गार्डे व त्यांची मुलगी मंगल हिला दावा मिळकतीत मी पाहिलेले होते.

**<u>मध्यांनाची वेळ झालेने तहकूब.</u>**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

(आर. एम. भेंडे)

दिनांक:-१७/०३/२०२६.		२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, वाई.

<u>मध्यानानंतर साक्षीदाराचा उर्वरित उलटतपास पुन्हा शपथेवर सुरू</u>.

०४.		हे म्हणणे खरे आहे की, मारूती रामा गार्डे यांना ओळखत नसताना तसा मजकूर माझ्या शपथपत्रात नमुद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मिळकतीत सलग २४ तास हजर नसल्याने प्रतिवादी क्र. १ मंगल दावा मिळकतीत येवून वहिवाट करते किंवा कसे याविषयी मला सांगता येणार नाही. मंगल हिने दावा मिळकतीत वेगवेगळी पिके घेतल्याचे व ती बाजार समितीमार्फत विकल्याचे मला माहिती नाही.

०५.		हे म्हणणे खरे आहे की, मला दिलीप गार्डे यांच्या भावाचे नाव सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे साक्ष शपथपत्र कोणी तयार केले व ते कोणी टाईप केले

हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, साक्ष शपथपत्रावर सही करण्याखेरीज मला प्रस्तुत प्रकरणाबाबत काहीएक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दिलीप गार्डे यांच्या वडिलांचे नाव सांगता येणार नाही.

०६. हे म्हणणे खरे आहे की, मी राहायला व्याहळी पुर्नवसन येथे आहे आणि त्यामुळे मला शेती करण्यासाठी तेथून साहित्य माझ्या शेतमिळकतीत आणावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, मला शेतीसाठी लागणारे यंत्र व इतर साहित्य मला व्याहळी येथून आणावी लागतात. हे म्हणणे खरे नाही की, बावधन येथे मला कोणीही ओळखत नसून माझ्या मदतीला कोणीही येत नाही. माझी शेत मिळकत दावा मिळकतीला चिटकून असल्याचे दर्शविण्याकरीता मी तसा उतारा दाखल करू शकतो. मला वादी व प्रतिवादी यांच्यात दावा मिळकतीबाबत वाद सुरू असल्याचे माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल आमच्या घरचे कर्ते पुरूष होते आणि तेच बावधन येथील आमची शेती करत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या हयातीत मला बावधन येथील शेतमिळकतींकडे लक्ष देण्याचा प्रसंग आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दोन ते तीन वर्षांपुर्वी माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर मी बावधन येथील शेतमिळकत बघू लागलो. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० मध्ये सदरील जमिन व आमचे घर माझे वडिलच बघत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांच्या हयातीत मला दावा मिळकतीची माहिती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या साक्ष शपथपत्रातील मजकूर खोटा असल्याचे मला सांगता येणार नाही कारण मी तो वाचलेला नाही.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास काहीही नाही.**

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- १७/०३/२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, वाई.